॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.५ (        ) राष्ट्रीय सेवा योजनेच्या चंदीगड येथे झालेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाला चार पारितोषिके मिळाली असून आकाश धनगर हा राष्ट्रीय पातळीवर सर्वोत्कृष्ट रासेयो स्वयंसेवक ठरला आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्रीय एकात्मता शिबीर दि.२४ ते ३१ मार्च, २०१९ या कालावधीत शिवालीक पब्लीक स्कुल मोहाली, चंदीगड येथे संपन्न झाले. भारतातुन या शिबीरासाठी १२ राज्यातील २१० स्वयंसेवक सहभागी झाले होते. यात कबचौउमवि संघास चार बक्षिस मिळाले असून समूह गीतात प्रथम, पथसंचलनात द्वितीय, आकाश धनगरने शिबीरात उत्तम कामगिरी करीत सर्वोत्कृष्ट रासेयो स्वयंसेवकाचा पुरस्कार पटकावला. पोस्टर मेकींग स्पर्धेत कांचन चव्हाण हिस द्वितीय क्रमांकांचे बक्षिस मिळाले.

या शिबीरात कबचौउमवि संघाने उत्तम कामगिरी करीत विद्यापीठाचा नावलौकीक वाढविला. संघात प्रज्वल बडगुजर, धनराज पाटील, हेमराज सुर्यवंशी, दुर्गादास माळी, संगीता पावरा, अश्विनी भिल, आकाश धनगर,दिपक ब्राम्हणे, अशोक पावरा, कांचन चव्हाण, सिमा वाघ, जयश्री देवरे, सविता नाईक, मयुरी परदेशी हे विद्यार्थी तसेच संघव्यस्थापक म्हणून डॉ.दत्ता आसाराम ढाले, एस.एस.व्ही.पी.एस.चे डॉ.पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे यांचा सहभाग होता. बक्षिस प्राप्त रासेयो स्वयंसेवकांचा सत्कार कुलगुरु, प्र-कुलगरु व कुलसचिव यांच्या हस्ते करण्यात आला. संघात सहभागी असलेल्यांचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, मा.राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन, डॉ.अतुल साळूखे, युथ ऑफीसर,विभागीय कार्यालय पुणे, अजय शिंदे, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील, व्य.प.सदस्य दिलीप रामु पाटील, प्रा.ए.बी.चौधरी, संचालक, रासेयो डॉ.पंकजकुमार नन्नवरे, संचालक, विद्यार्थी विकास प्रा.सत्यजित साळवे, परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील व प्र.वित्त व लेखाधिकारी एस.आर.गोहिल यांनी अभिनंदन केले आहे.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ५ एप्रिल,२०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी